जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २३०          दिनांक - ०४/०५/२०२४**

फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मौजमजा करण्यासाठी मोटारसायकल चोरणा-या अट्टल चोरटयास केली अटक

दि.२२/०४/२०२४ रोजी तपास पथकातील पोलीस अंमलदार हे नेहरु चौक भाजी मार्केट भागात पेट्रोलींग करत होते. पेट्रोलींग करत असताना पोलीस अंमलदार हे वाहन चोरीच्या अनुषंगाने वारंवार सी.सी.टी.व्ही कॅमेरे चेक करत असल्याने सी.सी.टी.व्ही फुटेज मधील वर्णना प्रमाणे एक मिळता-जुळता इसम नेहरु चौक, भाजी मार्केट येथे आला असले बाबत पोलीस अंमलदार समीर माळवदकर यांना गोपनिय बातमी दारामार्फत माहीती मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांना बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाप्रमाणे एक इसम दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन फरासखाना पोलीस स्टेशन येथे आणुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **खंडु दिलीप चौधरी,वय-२३ वर्षे,रा.मु.पो. निटुर,साधनाथ मंदीराशेजारी,ता.निलंगा,जि.लातुर** असे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी करता सदर इसमाने फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीतील रविवार पेठ,नेहरु चौक भाजी मार्केट,मंडई परिसरातुन मोटारसायकली चोरी केल्याचे सांगुन चोरलेल्या दुचाकी मोटार सायकल त्याच्या मुळगांवी ठेवल्या असल्याचे कबुल केल्याने त्याच्या मुळगांवी जाऊन शिरुर आनंतपाळ पोलीस स्टेशन कडील स्थानिक पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार एस.एस.शिंदे यांची मदत घेऊन फरासखाना पोलीस स्टेशन कडील सहा. पोलीस निरीक्षक, वैभव गायकवाड, व पोलीस अंमलदार यांनी १३ दुचाकी मोटारसायकल जप्त केल्या आहेत. सदरचा आरोपी हा सन २०२१ पासुन वाहन चोरी करत असल्याचे दिसुन आले असुन सदर बाबत फरासखाना पोलीस स्टेशन येथे ७ गुन्हे, कोथरुड पोलीस स्टेशन २ गुन्हे,चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन १ गुन्हा, विश्रामबाग पोलीस स्टेशन ३ गुन्हे असे एकुण १३ गुन्हयातील मोटार सायकल आरोपी याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्री.संदीपसिंह गिल, मा.सहा.पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्रीमती रुक्मिणी गलंडे यांचे यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.प्रशांत भस्मे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.अजित जाधव, सहा.पोलीस निरीक्षक वैभव गायकवाड, पोलीस उप निरीक्षक निलेश मोकाशी,पोलीस अंमलदार रिजवान जिनेडी,समिर माळवदकर,राकेश क्षीरसागर,प्रविण पासलकर,वैभव स्वामी,सुमित खुट्टे,संदीप कांबळे,मेहबुब मोकाशी,प्रमोद मोहीते,गणेश आटोळे,शशीकांत ननावरे,तुषार खडके,अजित शिंदे यांच्या पथकाने केली आहे.